"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"
दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३
**WEB SITE : http://www.nkgsbsangh.org**
**E-MAIL : nkgsbs@gmail.com**
कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। शत्रोरपि गुणावाच्या दोषा वाच्या गुरोरपि।।

मूल्य रु. ५


क्रमांक ४ वर्ष : ३८ जानेवारी-मार्च २०१८

**BOOK POST**


Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.



## मुंबई मंच – कारवारी मेळाव्याचे आमंत्रण



**'कारवारी खाद्यमेळाव्याला'** दरवर्षी मिळणाऱ्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे स्फूर्ती घेऊन यंदाही एक 'आनंद मेळावा' भरविण्यात येत आहे. पाककृतीशिवाय ज्यांना आपण बनविलेल्या वस्तू किंवा पदार्थ विक्रीसाठी किंवा प्रदर्शनासाठी ठेवायचे असतील, व ज्यांना बालगोपाळासाठी करमणुकीचे खेळ आयोजित करावयाचे असतील त्यांनाही गाळा मिळेल. इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा.

**तारीख व समय** : **रविवार १८ फेब्रुवारी २०१८ संध्याकाळी ५.०० ते ९.००**
**कार्यस्थळ** : **सरस्वती बाग, जोगेश्वरी, के.जी एस. सोसायटी पटांगण**
**आकार** : **रु. ८०० एका गाळयासाठी**
**संपर्क** : **गाळा आरक्षणासाठी व पाककृती ठरविण्यासाठी. (रात्री ७ ते १०)**

**रसिका गायतोंडे : ९९६७४३४४०१ राजू बोरकर : ९८२०९१७८४१**

**संपर्कासाठी अंतिम तारीख : ४ फेब्रुवारी २०१८.**

## ठाणे मंचतर्फे ज्येष्ठ नागरिकांसाठी शिबीर

**दिनांक** : **१३ मार्च ते १५ मार्च २०१८**
**(३ दिवस व दोन रात्र)**
**शुल्क** : **अंदाजे ₹ ३५०० प्रत्येकी**
**स्थळ** : **१५ जानेवारीनंतर कळविण्यात येईल**
**मर्यादित जागा, प्रथम नोंदणीस प्राधान्य**

**संपर्क**

| | | |
|---|---|---|
| **सुरेश पालेकर** | **मंजिरी कुलकर्णी** | **किरण दिवेकर** |
| ९९६९४५५३७० | ९६६५०९८११७ | ९६१९३६२४६० |

## हळदीकुंकू समारंभ - भगिनींस आमंत्रण

नेहमीचा मकरसंक्रांतीचा हळदीकुंकू समारंभ यंदा माहीम व ठाणे येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळांत वेळ काढून आपल्या लेकीसुनांसह सोयीस्कर ठिकाणी अवश्य यावे ही विनंती

| | माहीम | ठाणे |
|---|---|---|
| **तारीख** | रविवार १४ जानेवारी २०१८ | शुक्रवार १९ जानेवारी २०१८ |
| **कार्यस्थळ** | माटुंगा मित्रमंडळ, एफ ४, कर्नाटक बिल्डींग, मोगल लेन, माहीम | सौ. चित्रा कामत, यांच्या निवासस्थानी ५०२, विहंगविहार,पांचपाखाडी, ठाणे |
| **वेळ** | संध्याकाळी ५ ते ७ | संध्याकाळी ४.३० ते ७.३० |
| | **संघ कार्यकारिणीतर्फे** | **सांस्कृतिक मंचतर्फे** |
| | किशोरी अ. वागळे | चित्रा कामत |
| | निलीमा श. नाडकर्णी | मंजिरी कुलकर्णी |

# संपादकीय

### कै उमेश भेंडे यांच्या इच्छेनुसार समाजसेवा निधीला व वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ ५७,५०,००० रूपयांची विक्रमी देणगी

कारवार येथील गेल्या पिढीतील एक लोकप्रिय शिक्षक व हिंदूहास्कूलचे मुख्याध्यापक श्री. शांताराम दत्तात्रय भेंडे यांची तीनही मुले दत्तात्रय (चंद्रकांत), उमेश व किशोर हे अमेरिकेत स्थायिक झालेले आहेत. उमेश यांचे अडीच वर्षापूर्वी दु:खद निधन झाले. निधनापूर्वी काही दिवस अगोदरच त्यांनी संघाला एक पत्र पाठवून एका मोठ्या रकमेचा डॉलरमधला धनादेश पाठविला होता. त्यावेळी संघाला विदेशी चलनांतील रक्कम स्वीकारायची परवानगी नव्हती. म्हणून तो धनादेश वठवता आला नाही. गेल्या दोन वर्षे सतत पाठपुरवठा करुन संघाला सदर परवानगी मिळाली आहे. दरम्यान त्यांच्या निधनानंतर त्यांच्या खात्यातील रक्कम नामनिर्देषित बंधू किशोर यांच्या खात्यात जमा झाली. अलीकडेच किशोर यांनी उमेश यांच्या इच्छेनुसार त्यांतली ५० टक्के रक्कम म्हणजे रु. ५७,५०,००० संघाच्या खात्यात जमा केली. उर्वरीत ५० टक्के रक्कम काही तांत्रिक कारणामुळे पुढच्या आर्थिक वर्षात जमा होईल. उमेश यांनी आपल्या पत्रांत लिहिल्याप्रमाणे ७५ टक्के रक्कम समाजसेवा निधीसाठी आहे व उर्वरीत २५ टक्के वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ आहे.

संघाला आतांपर्यत समाजसेवानिधीसाठी मिळालेल्या सर्व देणग्यांमध्ये ही रक्कम विक्रमी आहे. यामुळे यापुढे संघाच्या ६० लाभार्थी कुटुंबाना मासिक रु. ४०० वाढीव साहाय्य देणे शक्य होईल व पुढच्या वर्षी उर्वरीत ५० टक्के रक्कम मिळाल्यावर आणखी रु. ४०० वाढीव साहाय्य देणे शक्य होईल.

दिवंगत उमेश यांना संघाची श्रद्धांजली. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो.

**नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा**

१ जानेवारी २०१८

द. ना. नाडकर्णी

## विवाहाचा सुवर्णमहोत्सव गाठणाऱ्या जोडप्यांना वार्षिक स्नेहसंमेलनात स्मृतिचिन्हे देण्यात आली त्यांची नावे

| | | | |
|---|---|---|---|
| श्रीमती दुर्गा | व | श्री. जयवीर दत्तात्रय इस्लूर | – शिर्सी |
| श्रीमती मनीषा | व | श्री. माधव गजानन कसबेकर | – माहीम |
| श्रीमती नलीनी | व | श्री. विनायक वासुदेव मुझुमदार | – जोगेश्वरी |
| श्रीमती कांचनगौरी | व | सुधीर नीलकंठ तेलंग | – बोरीवली |
| श्रीमती शुभदा | व | श्री. सतीश विनायक वागळे | – पारले |
| श्रीमती नीता | व | डॉ. श्रीकांत शांताराम वागळे | – गांवदेवी |

## ७५ वर्षे वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना स्मृतिचिन्हे देण्यात आली त्यांची नावे

| | |
|---|---|
| वसंत शांताराम भेडसगांवकर | जोगेश्वरी |
| कुंदा किशोर बोरकर | दादर |
| ऊर्मिला शरद दळवी | गोवा |
| किशोर दिगंबर कुलकर्णी | पारले |
| आशा शशिकांत नाडकर्णी | माहीम |
| उज्जैनी विश्वेश्वर सुखटणकर | सदाशिवगड |
| कांचनगौरी सुधीर तेलंग | बोरीवली |
| शशिकांत गणपत तिळवे | माहीम |
| अरुण प्रभाकर वागळे | माहीम |
| गणपत (विजय) काशिनाथ वागळे | वसई |
| सुहासिनी अरविंद वर्टी | जोगेश्वरी |
| अरविंद बळवंत बोरकर | वडाळा |
| शैला देवीदास बोरकर | अंधेरी |
| अरविंद विश्वनाथ गायतोंडे | बोरीवली |
| सुरेश दिनकर मुझुमदार | डोंबीवली |
| गोविंद दत्ताराम पालेकर | बिणगा |
| विनायक महाबळेश्वर तेलंग | बेंगळूर |
| मधुकर शिवराव तेलंग | कांदिवली |
| सरला आनंद वागळे | बाड |
| अरुण गणपत वागळे | पारले |
| नीता श्रीकांत वागळे | गांवदेवी |


**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**

**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433

Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) , Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

# प्रकाशझोत

## श्री. वसंत फेणे लिखित 'कारवारी माती' या कादंबरीचे ग्रंथालीतर्फे प्रकाशन




सर्वसामान्य माणसांचे अनुभवविश्व उत्कृष्टपणे रेखाटणारे कथा लेखक व कादंबरीकार म्हणून श्री. वसंत नरहर फेणे सुप्रसिध्द आहेत. त्यासाठी त्यांना गेल्या वर्षी 'शब्द द बुक गॅलरी' या संस्थेतर्फे भाऊ पाध्ये साहित्य गौरव पुरस्कार प्रदान करण्यांत आला होता. २००५ साली मॅजिस्टीक प्रकाशनतर्फे त्यांच्या 'विश्वंभरे बोलविले' या कादंबरीला प्रतिष्ठित जयवंत दळवी पुरस्कार देण्यांत आला होता. 'काना व मात्रा' या लघुकथासंग्रहाला मागे महाराष्ट्र राज्य पुरस्कार मिळाला होता. त्यांची आतापर्यंत जवळजवळ २८ कादंबऱ्या व लघुकथासंग्रह प्रसिध्द झाले आहेत. 'कारवारी माती' ही त्यांची शेवटची कादंबरी. त्याची पृष्ठसंख्या सहाशेहून किंचित कमी आहे. एवढे मोठे प्रचंड लिखाण वयाची नव्वदी ओलांडण्यानंतर त्यांनी पूर्ण केले हे खरोखरच कौतुकास्पद आहे. या कादंबरीचे प्रकाशन 'ग्रंथाली' या संस्थेतर्फे २ डिसेंबर रोजी प्रसिध्द पत्रकार दिनकर गांगल यांच्या हस्ते झाले.

या कादंबरीतले कथानक १९०१ ते १९४७ या कालावधीतील आहे. म्हणजे स्वातंत्र्यपूर्वकालीन व दोन महायुध्दे या दरम्यान झालेली आहेत. अंकोला येथील होन्नेकेरी वाडयात राहणारा गणपत हिचकड आणि त्याचा मुलगा विद्याधर ही पात्रे या कादंबरीत केंद्रवर्ती आहेत. त्या दोघांच्या अवास्तव बौध्दिक तसेच भावनिक अहंकारामुळे त्यांच्या आप्तेष्टांची होत गेलेली फरफट, त्या सर्वांच्या स्वभावांचे विलक्षण कंगोरे, या सगळ्यांचा कादंबरीकाराने सूक्ष्म निरीक्षण पध्दतीने जो वेध घेतला आहे तो मनोवेधक आहे. यातील सर्व घटनांना स्वातंत्र्यपूर्व कालीन पार्श्वभूमी असल्याने त्या काळातील जातपातीचे, चालीरीतीचे व संस्कृतीचे जिवंत वाटणारे वर्णन आहे. एकूण कादंबरीतील कल्पनासौंदर्य, अंतर्मुख कारणाऱ्या घटना, गहिरी व प्रवाही शब्दशैली, इत्यादी गुणांमुळे लेखन समृध्द होत गेले आहे.

(मूळ मूल्य रु. ६००, ग्रंथाली प्रकाशन, दादर (२४२१६०५०) यांच्यातर्फे सवलतीची किंमत रु. ४०० रुपये)

## डॉ. रमाकांत वर्टी यांची शंभरी, लष्करातर्फे सत्कार



मूळ बाड गांवचे नंतर नाशिकला वर्टी कॉलनीमध्ये स्थायिक झालेले व सध्या सांताक्रुजला वास्तव्याला असणारे ले. कर्नल डॉ. रमाकांत वामनराव वर्टी यांनी २९ नोव्हेंबर रोजी वयाची शंभरी गाठली त्यानिमित्त त्यांचे हार्दिक अभिनंदन. आपला संघ व आपली एज्युकेशन सोसायटी या उभय संस्थेतर्फे त्यांच्या निवासस्थानी जाऊन नेहमीच्या

प्रथेप्रमाणे त्यांना शाल व श्रीफळ देण्याचा व त्यांच्याकडून आशीर्वाद स्वीकारण्याचा कार्यक्रम दोन दिवस अगोदर निश्चितही करण्यांत आला होता पण आदल्याच दिवशी निरोप आला की त्यांचे आरोग्य ठीक नाही व नाईलाजामुळे त्यांच्या सत्काराचा कार्यक्रम रहित करावा लागला. तरीही विशेष नमूद करावयाचे म्हणजे नवी दिल्ली लष्कर प्रमुख कार्यलयातर्फे दोन ब्रिगेडीयर त्यांच्या घरी आले होते व फ्रेम केलेले एक शुभेच्छापत्र देऊन त्यांनी त्यांचा सत्कार केला. दुर्दैवाने दुसऱ्याच दिवशी म्हणजे ३० नोव्हेंबर त्यांच्या पत्नी श्रीमती मंगला वर्टी यांचे दुःखद निधन झाले.

१९४० मध्ये मुंबईतील नायर दंत महाविद्यालयांत पदवी घेतल्यानंतर त्यांनी दुसऱ्या महायुध्दाच्यावेळी १९४२ मध्ये लष्करांतील आर्मी डेंटल कोरमध्यें कमिशन घेतले. महायुध्दाच्या काळात बर्मा फ्रंटवर (आताचे म्यानामार) त्यांची नेमणूक झाली. साधारण ३० वर्षे लष्करांत सेवा करणारे डॉ. वर्टी १९७२ साली निवृत्त झाल्यावर नाशिकच्या वर्टी कॉलनीत स्थायिक झाले. १९७५ ते १९९५ दरम्यान ओझर येथील हिंदुस्थान एरोनॉटिक्स येथे दंत सल्लागार म्हणून त्यांनी काम पाहिले. इंडियन डेंटल असोसिएशनच्या नाशिक शाखेची स्थापना त्यांनीच केली होती. उत्तम क्रिकेटपटु म्हणून नावाजलेले डॉ. वर्टी काहीं काळ लष्कराच्या क्रिकेट संघातून राष्ट्रीय स्तरावर क्रिकेट सामने खेळले आहेत. सुप्रसिध्द कसोटीवीर हेमू अधिकारी त्यांचे सहखेळाडू होते.

डॉक्टरांच्या शंभरीनिमित्त नाशिक येथील स्थानिक वृत्तपत्रांमध्ये फोटोसकट बातम्या प्रसिध्द झाल्या होत्या त्यावरुनच त्यांची कर्तबगारी लक्षांत येते.

## अंतर्गत लेखापरीक्षकांच्या आशिया पॅसिफिक महासंघातर्फे श्री. नागेश पिंगे यांना उत्कृष्ट कार्याबद्दल पुरस्कार.

भारत, ऑस्ट्रेलिया, चीन, कोरिया, जपान, इत्यादी आशियांतील सतरा देशांतील अंतर्गत लेखा परीक्षणांच्या संघटनांचा मिळून 'एशियन कॉन्फीडरेशन ऑफ इंटर्नल ऑडिटर्स' हा एक मध्यवर्ती महासंघ आहे. या महासंघातर्फे प्रतिवर्षी या क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तीला पुरस्कार देऊन त्याचा सन्मान करण्यांत येतो. २०१७ सालचा हा पुरस्कार आपल्या बँकेचे संचालक श्री. नागेश दिनकर पिंगे यांना मिळाला आहे. गेल्या महिन्यांत नवी दिल्ली येथे भरलेल्या एका समारंभात महासंघाच्या अध्यक्षांतर्फे या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यापूर्वी २०१५ साली The Institution of Chartered Accountants या संस्थेतर्फे त्यांना 'बेस्ट सीए अवॉर्ड' हा पुरस्कार देऊन विभूषित केले होते. श्री. पिंगे यांचे हार्दिक अभिनंदन.

## दिवसातून चाळीसवेळा अपस्माराचे झटके येणाऱ्या चार महिन्याच्या बालकावर यशस्वी शस्त्रक्रिया करणारे डॉ. दत्तात्रय मुझुमदार

वांद्रे येथे राहणारे डॉ. दत्तात्रय (निमीष) प्रकाश मुझुमदार हे न्युरोसर्जरी विषयांतील तज्ज्ञ जी. एस. मेडीकल कॉलेज येथे प्राध्यापक आहेत. भारतामध्ये अपस्माराचे रुग्ण लोकसंख्येच्या सुमारे एक टक्के एवढे आहे. काही रुग्णामध्ये केवळ औषधोपचाराने आजार आटोक्यामध्ये येऊ शकतो तर काहींना शस्त्रक्रियेची आवश्यकता असते. गोव्यातील एका दुर्दैवी बालकाला जन्मत:च दिवसांतून चाळीस वेळा झटके येत असत. कुठल्याही औषधाने त्याचा रोग आटोक्यांत येत नसे. म्हणून त्याला मुंबईत आणून के. ई. एम् इस्पितळात दाखल करण्यांत आले. गेल्या ऑक्टोबरमध्ये त्याच्यावर यशस्वीरीत्या शस्त्रक्रिया करण्यांत आली. ही अवघड शस्त्रक्रिया करण्याऱ्या टीममध्ये डॉ. मुझुमदार हे एक होते व त्याला वृत्तपत्रांतून प्रसिद्धीही मिळाली होती.

डॉ. मुझुमदार यांना मागे ओटावा, कॅनडा, विद्यापीठाची पेडियाट्रीक न्युरोसर्जरीवरील उच्च शिक्षणासाठी क्लिनीकल फेलोशिप मिळाली होती. पेडियाट्रीक न्युरोसर्जरी या अति प्रगल्भ विषयांत उच्च शिक्षण घेणाऱ्या मोजक्याच भारतीयांमध्ये त्यांचा समावेश आहे.

डॉ. मुझुमदार हे नाशिक येथील प्रख्यात साहित्यिक डॉ. अ. वा. वर्टी यांचे नातू होत.

## कु. संज्योत तेलंग हिचे पॅरीसमध्ये फॅशन डिझाईन क्षेत्रांत उज्ज्वल यश

कारवारचे जुन्या पिढीतील ज्येष्ठ नागरीक रा. ब. तेलंग म्हणजेच सर्वांच्या परिचयाचे 'गणपामामा' यांची पणती व अंधेरी येथे राहणारे आर्किटेक्ट श्री. सुधीर शंकर तेलंग यांची धाकटी कन्या कु. संज्योत ही पॅरीसमध्ये फॅशन फोटोग्राफी व फॅशन डिझाईन या क्षेत्रांत कार्यरत आहे. मागे तेथे एका फोटोग्राफी स्पर्धेत तिला एक सुवर्णपदक व दोन रौप्यपदके मिळाली होती. त्याचे वृत्त मुखपत्रिकेत आलेले आहे. आपल्या उज्ज्वल कामगिरीचा वसा तिने पुढे ठेवला आहे. नुकत्याच तेथे झालेल्या 'La Bourse Du Talent' या एका पतिष्ठित समजल्या जाणाऱ्या स्पर्धेत तिने भाग घेतला. 'Down's Syndrome' पीडित मुलीवर तिने केलेल्या 'Fashion Misfits' या प्रकल्पाला तिला अव्वल पुरस्कार मिळाला. फ्रेंच नॅशनल लायब्ररी येथे १५ डिसेंबर ते ४ मार्च या कालावधीत हा संकल्प प्रदर्शनांत मांडण्यात येत आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल संज्योतचे खूप कौतुक होत आहे. संघातर्फेही हार्दिक अभिनंदन.

**(पुढील मजकूर पृष्ठ १९ वर)**

# वार्षिक स्नेहसंमेलन

प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही शनिवार १९ नोव्हेंबर२०१७ रोजी अँटोनियो डिसिल्व्हा हायस्कूल हॉलमध्ये आपल्या ज्ञातिबांधवांचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. जवळजवळ तीनशे लोकांची उपस्थिती होती.

ब्रिगेडियर डॉ. राजीव गोपाळकृष्ण दिवेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सौ. प्राची प्रदीप देसाई यांनी केले.

परंपरेप्रमाणे व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. मुख्य कार्यक्रमाच्या अगोदर गतवर्षी निधन पावलेल्या ज्ञातिबांधवांच्या स्मृतीप्रीत्यर्थ एक मिनिट स्तब्धता पाळून त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. सौ. प्रज्ञा शंकर वागळे यांनी धीरगंभीर आवाजात सरस्वती स्तवन सादर केले. त्यानंतर संघाचे अध्यक्ष श्री. मारुती दळवी यांनी प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ व संघाचे स्मृतीचिन्ह देऊन स्वागत केले. त्यानंतर संघाचे अध्यक्ष श्री. मारुती दळवी व एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. देवदास नाडकर्णी यांनी आपापल्या संस्थांच्या गतवर्षीच्या ठळक घटना व मिळालेल्या देणग्यांचा आढावा घेतला. यानंतर संघाचे उपाध्यक्ष श्री. शिरीष वाघ यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करुन दिली. यानंतर सौ. प्राची देसाई यांनी प्रमुख पाहुण्यांना दोन शब्द बोलण्याची विनंती केली.

डॉ. दिवेकर यांनी लष्करी जीवन कसे व का स्वीकारले, त्याचा फायदा त्यांना कसकसा झाला, व लष्करी लोकांना समाजात किती आदर मिळतो व त्यांना स्वत:लाही कसे उच्च शिक्षण घेता आले याचे रंजक व खुमासदार शैलीत वर्णन केले.

आपल्या सर्वांच्या परिचयाचे डॉ. सदानंद विनायक नाडकर्णी यांना संघातर्फे गेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मानद सदस्यत्व देण्यात आले होते. त्याबद्दल त्यांना शाल व श्रीफळ देऊन प्रमुख पाहुण्यातर्फे सत्कार करण्यात आला.

डॉ. नाडकर्णी यानीही रंजक शैलीत आपले अनुभव सांगितले. त्यांनी आपल्यातर्फे प्रत्येक कुटुंबाला Restructuring Medical Education असे एक छोटेखानी पुस्तक दिले.

श्री. सुरेश पालेकर यांनी ठाणे मंचच्या आगामी कार्यक्रमांची घोषणा केली. मध्यंतरानंतर नेहमीच्या प्रथेप्रमाणे विवाहाची सुवर्णजयंती गाठणाऱ्या जोडप्यांचा व वयाचा अमृत महोत्सव साजरा करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. याचे विनेदन श्री. सुरेश पालेकर यांनी केले. ७५ वर्षे पूर्ण करण्याऱ्यापैकी एक सौ. सुहासिनी वर्टी यांनी प्रमुख पाहुणे डॉ. दिवेकर हा आपलाच मामेभाऊ हे अभिमानाने सांगितले व भावातर्फेच आपला सत्कार झाला म्हणून आपला आनंद द्विगुणीत झाला असे

म्हटले. आपला भाऊ एवढ्या मोठ्या पदावर असूनसुद्धा किती साधा, प्रेमळ व कुटुंबवत्सल आहे हे विशद करतांना त्यांना गहिवरुन आले.

ज्ञातीतील विशेष गुणवंत विद्यार्थ्यांना एज्युकेशन सोसायटीतर्फे स्मृतीचिन्हे व पारितोषिके प्रदान करण्यात आली ते विद्यार्थी म्हणजे श्री. सलील श्रीपाद नाडकर्णी यांना कराटे पध्दतीत ब्लॅकबेल्ट मिळाला. संचित नितीन तेलंग यास क्लिन्टन ग्लोबल इनिशिएटीव्ह तर्फे अंतिम फेरीसाठी निवड झाली. अन्विता प्रशांत तेलंग हिला गुगलच्या राष्ट्रीय स्पर्धेत पहिला क्रमांक मिळाला. याचे निवेदन सौ. प्राची देसाई यांनी केले.

त्यांनंतर विविध परीक्षांमध्ये विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या इतर विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रके व बक्षिसे देण्यात आली.

सौ. नीता अभय नाडकर्णी यानी पारंपरीक नऊवारी साडीत ओटी भरण्याचा कार्यक्रम उत्तम रीतीने पार पाडला व कार्यक्रमाची शोभा वाढवली. कुमारी तेजश्री दत्तकुमार कुलकर्णी हिने स्वयंसेविकेचे काम करुन मोलाची मदत केली. व्यासपीठावर येऊन सौ. प्राची देसाई हिने आभार प्रदर्शन केले व सर्व मुलांनी व्यासपीठवर येऊन राष्ट्रगीत गाऊन ह्या कार्यक्रमाची सांगता केली.

**मृदुला भांडारकर, गिरगांव**

## विवाह /वाङ्‌निश्चय

| | | |
|---|---|---|
| अपर्णेश शांताराम (विनय) बोरकर, दादर | व | देविका दिनकर जयदेवकर, वांद्रे |
| श्रेया अनंत तेलंग, गदग | व | ईशान प्रकाश गोगावेकर, कोल्हापूर |
| ईशा उमेश तेलंग, पुणे | व | विनय (अमोल) राजीव पत्की, पुणे |

## परदेशात वास्तव्यास असलेल्या बांधवांना आता संघासही देणग्या देण्याची सोय

**मागे चार वर्षापूर्वी मुखपत्रिकेच्या द्वारे सर्वांना कळविण्यांत आले होते की आपल्या एज्युकेशन सोसयटीला भारत सरकारच्या गृहमंत्रालयाकडून परदेशांतून देणग्या स्वीकारण्यास परवानगी मिळाली होती. कळविण्यास आनंद होतो की, आपल्या संघासही आता ही परवानगी मिळाली आहे. सर्व वाचकांना नम्र विनंती आहे की, त्यांनी परदेशांत स्थायिक झालेल्या आपल्या नातवाईकांना ही माहिती कळवावी. अधिक माहितीसाठी संघाच्या कार्यालयांत संपर्क साधावा.**




SIP in Mutual Funds will help you to save regularly & discipline manner,
To achieve your goal..

| Monthly Investment required for target of Rs.1 Crore | | | |
|---|---|---|---|
| No. of Years | CAGR Returns | | |
| | 12% | 15% | 18% |
| 10 | Rs. 43,471/- | Rs. 36,335/- | Rs. 29,739/- |
| 15 | Rs. 20,017/- | Rs. 14,959/- | Rs. 10,879/- |
| 20 | Rs. 10,109/- | Rs. 6,679/- | Rs. 4,267/- |
| 25 | Rs. 5,322/- | Rs. 3,083/- | Rs. 1,717/- |

**Mangsidesh Investments Pvt Ltd.**

Head Office : 402, Business Point Bldg, Behind Brahma Kumari Hosp., Andheri (West)
Tel No. 022 - 4233 2323/ 6584 1233/ 6523 8964
Branch Office : A/53, Shanti Shopping Centre, Next to ICICI ATM, MiraRoad 401 107
Tel No. +91 91672 20380 / 022 - 2855 2111/ 2812 7555
1/11, Kappeesh Tower, M.G. Road, Mulund (West), Mumbai 400 080
Tel No. + 91672 20379/ 022 - 6500 1366

Mutual Fund Investments are subject to market risks, Read all schemes related documents carefully.

# वार्षिक स्नेहसंमेलनातील क्षणचित्रे

(तपशील पृ. ८ वर)



डॉ. सदानंद नाडकर्णी यांचा प्रमुख पाहुणे ब्रिगेडीयर डॉ. राजीव दिवेकर
यांच्या हस्ते सत्कार करताना



**प्रमुख पाहुण्यासमवेत स्वयंसेवक**

वामन (विकास) नाडकर्णी, मृदुला भांडारकर, प्राची देसाई, प्रदीप देसाई,
देवदास नाडकर्णी, राजीव दिवेकर, विवेक कुलकर्णी, मारुती दळवी,
शिरीष वाघ, मंगेश पालेकर

# SUMAN RUDRA WAGLE
# A TRIBUTE TO MY DEAR AAYI



My mother and Guru Suman R. Wagle (Wife of late Mr R R Wagle & daughter of late Mr M N Wagh) passed away on the 16'th November 2017 & completely left a void in my life which no one can fill.

The beautiful memories of the times spent together with you - My Mother evoke mixed feelings. On the one hand a feeling of deep warmth and satisfaction of being closely associated with you bring a smile and make me feel proud and happy, whilst on the other hand I realize that a life time is too short to understand this concept called "A Mother" and in it the personality called Suman Rudra Wagle.

My Aayi was a highly accomplished, multi-facetted personality who had broken the traditional mould that women of her generation would get classified under. Being thedaughter of a IncomeTax Commissioner of India ,she completed her Bsc (Hons), BSc (Tech) from UDCT, Mumbai in Pharmaceuticals &Fine chemicals.She believed in gaining versatility in everything she set her eyes on,be it cooking , driving , stitching clothes , embroidery etc. A complete social and a peoples person, she was awonderful host to the point that no guest left her home without gaining calories .

Aayi gave up her professional career in a bid to take care of us her children of whom she was fiercely protective. She tried to imbibe in us the principles of being fearless meticulous, disciplined ever open to learn and of being a wonderful host to whomsoever came home as she believed in " Athithi devo bhav" with no age barriers .

"Learning never stops and there are no barriers to learn ' is what she has always taught us .Most importantly she instilled in us children that " you should be able to do any job and not be dependant on others." Even today though I have not achieved her levels of efficiency I try to teach my children the same values. Aayi has handled her finances independently till the last on her own including filing of her Income tax returns this year.

Eventhough the last two years of her journey of life were difficult in terms of health, every time we opened the door and she saw any of us her face would display the most warm smile that infact would rid us of our problems. No health issue was a deterrant for her extremely positive attitudeand she never lost hope in life. She was always independent, positive & ever smiling really to face any challenges put forth.

There was never a single day in her life in these8 long years when she did not remember my Baba.Her connect with him was so strong but she never did display the fact that she missed him.

Aayi our departure has left a vaccumthat cannot be filled but in a bid to pay back in a small measure I promise to try & stand by the principle and teachings that you have given us.

**I still have so much to say to you. "I miss you MOM."**

I pray to God that May your soul rest in peace and hope that our relation as mother and daughter continues in the life after for many more lives to come.

**Madhura Amonkar, Deonor**

(पुणे येथे राहणाऱ्या श्रीमती सुमन रुद्रा (बाबुराय) वागळे या संघाच्या हितचिंतक होत्या. दरवर्षी पतीच्या पुण्यतिथीच्या प्रसंगी त्या संघाला पन्नास हजार रुपयांची देणगी देत असत. इतर प्रसंगी दिलेल्या देणग्या मिळून त्यांनी दिलेल्या देणग्यांची एकूण रक्कम सहा लाख रुपये एवढी आहे.)

## विजूले चुटकुले

डेंटीस्ट : अरे मंगेशा, तुगेले मुकारले दात कशे पडले रे?

मंगेश : मगेल्या बायलेन चपाती खूप कडक बनयली

डेंटीस्ट : मागीर तूं खावच्याक ना म्हणकाशिल्ले

मंगेश : तेच तर केल्ले हांवे

---

डॉक्टर : हांव तुका स्मरणशक्तीखातेर वकद दिल्ले ताजो किते फायदॉ जालॉ

नागेश : काईंच फायदो ना. हाव ते वकद घेवच्याकच विसरता

---


डॉक्टर : तुगेल्या बायलेक हे थर्मामीटर तोंड बंद कर्न एक मिनीट जिभेसकल दवरच्याक सांग

गणेश : कृपा कर्न एक तासाचे थर्मामीटर दिया.

विजय सदानंद वागळे, ठाणे
९२२१६०७५७७

www.kccgoa.in

कोमल हिरवी तृणपाती ही
अलगद झुलवी सर्वांग,
कोवळ्या सुवर्ण प्रकाशात
उजळून जाई आनंद



अप्रतिम निसर्गाने नटलेलं **सुखसमृद्धी**

**मंगेशाच्या देवळापासून 2 मिनिटांच्या अंतरावर,**
**मंगेशी, फोंडा- गोवा**



मनाला भुरळ घालणारं गोव्याचं आल्हाददायक सृष्टीसौंदर्य, प्रदूषणविरहीत हवा, खळाळणारं पाणी आणि सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर याने नटलेला आमचा नवा प्रकल्प 'सुखसमृद्धी' म्हणजे नावाला साजेसं असं सुख, समृद्धी आणि मांगल्याचं वरदान ठरेल हे नक्कीच. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मनःशांति मिळविण्यासाठी आजच आमच्याशी संपर्क साधा.

**फ्लॅटस् उपलब्धः 1 रुम किचन, 1 बी.एच्.के, 2 बी.एच्.के**

प्रॉजेक्ट मान्यताः गोवा टाउन प्लॅनिंग
कर्जसहाय्यः नामवंत वित्त संस्था

a Project by:
**कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी**

मुंबई ऑफिसः श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला, सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलि:**2683 3841/47/ 72.** मोबा: **98336 36451**
फॅक्सः 2683 3872 ई-मेलः kunalconstruction@vsnl.net, kunalconstructiongoa@yahoo.in

गोवा ऑफिसः टी- 1, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबा: 98209 33352, 98206 33321

गोवा साईटः 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

# प्रत्येक स्मार्त - कारवारकरान मनार घेवचे सारखे

ह्या लेखाची सुरवात करचे–पैलीच माका तीन गोष्टींचो तुमका कबुलीजबाब दिवचो आसा.

पैलो कबुलीजबाब म्हळयार हाव जरा इन्फॉर्मल मनुष! कोणाकही उपदेश दिवचे जे शास्त्र आसा, ताजे बेसीक ग्रामरसुद्धा माका बरोबर खबरना. तरीपण प्रयत्न करता.

आमगल्या ज्ञातीतले जे वयान मजेपेक्षा होड आसात तांका मगेलो आदरपूर्वक नमस्कार आणि जे लहान आसात तांका प्रेमळ आशिर्वाद.

जेन्ना जेन्ना हाव मगल्या मित्रपरिवारापैकी 'आमचेगली' कुटुंबांक मेळता तेन्ना तेन्ना आमगल्या स्मार्त कारवारकर कुटुंबातले खूप दोष अगदी प्रकर्षान दिसून येतात. आमचेगली कुटुंबात – तांका तांगेल्या भाषेचो खूप अभिमान! मागीर तो सदस्य कितलोही श्रीमंत किंवा गरीब उरु, कितलोही शिकील्लो किंवा अनपढ उरु, स्वत:ल्या आमचेगली भाषेत उलौची एक संधी सोडचो ना. स्मार्त कारवारकराली चली जर आमचेगली (सारस्वत) कुटुंबात गेली तर वर्साभितर ती चली आमचेगली भाषा उलौच्याक लागता. स्वत:ल्या आवयबाप्पायलागी उलैतना सुध्दा सारस्वत शब्दच जास्त भायर पडतात. उदाहरणच दिवचे झाले तर – आमगली शालीताई–पुतुमामा पालेकराली चली – गोपिचंद शिरुराबरोबर लग्न झाल्ली, अगदी अस्खलीत आमचेगली उलैता. अशीही उदाहरणा आसात कि 'सारस्वत' चली स्मार्त कारवारकराल्या घरात आयली की एक वर्साभीतर त्या घरातील मनश्याल्या उलौण्यात खूप आमचेगली शब्द येवच्या लागतात, ही सारस्वत लोकाले खूब कौतुक करचे सारखी गोष्ट आसा. तांका तांगेल्या भाषेचो खूप अभिमान! आणि दुर्दैवाने आमगले स्मार्त कारवारकर – केन्ना केन्ना माका असो संशय येता की खुबजणांक स्वत:ल्या भाषेत उलौच्याक सुध्दा लज्जा दिसता. आज माका मगल्या मनातली ही तळमळ भायर काढची आसा.

मगेलो दुसरो कबुलीजबाब म्हळ्यार हाव काय होडलो वक्तो ना आणि लेखक तर अजिबातच ना. पण मगेले जे बरेवाईट अनुभव आसात ते हाव प्रामाणिकपणे तुमचेमुकार दवरता.तातूत हाव काहीच फेरबदल करना आणि जेन्ना अनुभवाचे प्रसंग तुमचेमुकार जशाचेतशे जर दवरले तर ते बरौच्याक किंवा भाषणात सांगच्याक साबार तयारी सुध्दा करची पडना.

आणि तिसरो कबुलीजबाब म्हळयार हावे एका 'आमचेगली' वक्त्याले अशेच एक भाषण आयकिल्ले आणि त्या भाषणान माका हो लेख बरौच्याक प्रवृत्त केले.

आता माका तुमका जे मजेदृष्टीन, महत्वाचे सांगचे आसा थय वळ्या –

कारवारांत आसतना आणि अजूनही मगेलो आवडतो ब्रेकफास्ट म्हळ्यार उकडे

तांदलाची पेज, ती सुध्दा खास पेजेपरातात वाढील्ली, घाळणी घाल्ली वाळी भाजी, पापडाकिस्मूर, कायना जाल्यार आमलेचे लोणचे मजे दृष्टीन जगातलो अगदी रुचकर ब्रेकफास्ट! So ladies and gentlemen and the generation next - आता माका तुमका जे सांगचे आसा ते आमगल्या स्मार्त कारवारकराल्या कोकणी भाषेबद्दल. जरा please पूर्ण लक्ष दिवन् वाचात.

आजकाल आम्ही आणि आमगली चोरडा बरीच भाषा उलैतात. खूबजणाक कारवारी भाषेपेक्षा इंग्रजी भाषा – उलौच्याक आणि मनातल्या मनात विचार करच्याक सुध्दा सोपी पडता. इंग्रजीशिवाय मराठी, हिंदी तशेच तुळु, कन्नड, बंगाली आणि इतर भारतीय भाषा उलैतलीभी खूप स्मार्त कारवारी आसात. इतलेच न्हीय – जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश, अरेबिक अगदी अस्खलीत उलैतलीसुध्दा आमगली स्मार्त कारवारकराली चोरडा आसात. ही एक अगदि उत्तम गोष्ट आसा. वेगवेगळयो भाषा शिकील्यान तुमगले ज्ञान खूपच वाढता. जरुर खूप भाषा शिकांत पण आमगली मुळ भाषा – Our Route Language - आमगली मातृभाषा – कारवारी कोकणी जर तुम्ही उलैली नात तर एखाद्या टवटवीत झाडाची सगळी पाळा–मुळा जर छाटून काढली तर ताजी किते अवस्था जातली तशे आमगले जातले.

आम्ही उलौची भाषा ही फक्त तोंडान उलौची भाषा न्हय – तर आमगल्या जीभेरुचीची सुध्दा एक भाषा उरता. आमगल्या खावच्या जेवच्या पोटाचीभी एक भाषा आसा. कानाक आयकुची, डोळयान पळौची हाजी सुध्दा तांगतांगेली एक भाषा आसा आणि हाव तुमका सांगता की ह्यो सगळ्यो भाषा एकच आसात आणि ती म्हळ्यार स्मार्त कारवारकराबाबतीत तांगली मातृभाषा – कारवारची कोकणी आणि हे सत्य जगातल्या सगळ्या जाती धर्माच्या तांगतांगेल्या मातृभाषेकभी लागू पडता. आता कशे ते आम्ही विचार कऱ्या –

मगेल्यो तीन्ही चल्यो युरोप आणि अमेरिकेत रावतात. हाव केन्नाय तांका म्हणता की तुमगेले पोट continental आसच्याक पुरो. तुमगेल्या पोटाभाषेचे फेवरिट वर्डस् कदाचीत – पीजा, पास्ता, बर्गर, फ्रेंच फ्राईज उरतले. मगेली त्याबाबत काहीच हरकत ना. पण मगली एक विनंती आसा आणि ती म्हळ्यार – डाळीतोय, तिसरेमासावडे विसरनाकात, खोटया इडली आणि रोस, एरप्पे, मुळका, सुकरुंडे पळ्ळोन तोंड वाकडे करनाकात. मुगाकण्ण, मडगणे, आंब्यासासव तशेच जिरमिऱ्या कढी पळौन नाक वैर करनाकात. तुमगल्या आताच्या continental पोटांक, तागेल्या मुळ हक्काचे, कारवारी पदार्थ खाण्यापासून तांका लांब दवर नाकात. जेन्ना जेन्ना तुमका शक्य आसा तेन्ना तेन्ना तुम्ही स्वत: हे पदार्थ बनौन, नाजाल्यार इतर कुटुंबिय किंवा दोस्तांकडच्यान हाडौन पोटाक घालात. तुमका समाधान मेळतले.

तुम्ही सगळी किते ड्रेस घालतात, कसले नेसतात, तातूत कशे दिसतात हाजेबद्दल माका काय म्हणचे ना. तुमका जे जाय ते करात. पण या स्मार्त कारवारी शरीरालीभी एक भाषा

आसा. बहुतेक सगळे यंग तरुणांली मुंज झाल्लीच उरतली. तेन्ना एकपटी तरी जानवे घालन पळयात. जमल्यार सणावारी केन्नातरी धोतर/कद नेसात. तुमगल्या शरीराक विलक्षण समाधान मेळतले. जानव्याचे तुमगल्या गळयातले अस्तित्वच, तुमका, तुमचे नकळत, खूप सुख आणि समाधान दितले. सगळया तरुण आणि वयस्कर बायलाक हाव तुमका अशे सांगू इच्छिता की जेन्ना तुमका संधी मेळतली तेन्ना केसात एखादे फुल, गजरो, फुलाफाती जरूर माळात. सणवारी जमल्यार जीन्स घालनसतना साडी नेसात. अशे म्हणतात की शॉर्ट स्कर्टातली कामिनी नऊवारीत मोहिनी दिसच्याक लागतात. थोडेशे भांगर घालात. भले वर्सातल्यान एकपटी, पण तुमगल्या शरीराक, तुमकाच जाणीव जातली की एक विलक्षण सुवास येवच्या लागला.

शरीराप्रमाणे तुमगल्या डोळयाचीभी एक भाषा आसा. तुमगल्या डोळयाक तुम्ही सबंध युरोप, अमेरिका, सगळे जग दाखयात, जगातली सगळी आश्चर्य दाखयात, पण सगळे पळैले नंतर दरवर्सा जमलेना तरी एकपटीतरी प्रेमान कारवारात वचात. तुमगेले किंवा तुमगेल्या पूर्वजाले जन्मस्थान, जुने घर, जवळचे देवालय पळयात. देवळाची घाट वाजयात. कदाचित लहानपणात ऐकिल्लो तो आवाज ओळखूच्याक येतलो. शक्य उरले तर – या दिवसात जरा कठीणच आसा – शेणी कशी थापतात, भाणात उदाक कशे गरम करतात ते पळयात. तुमगेल्या पूर्वजाली शाळेक भेट दियात. जमलेच तर गावचे उत्सव, 'भांड' वगैरे तुमगल्या डोळ्याक दाखयात. तुमगेले डोळे फॅारेन विझीट पेक्षा कारवारांत जास्ती तृप्त आणि धन्य जातले.

I am not against modernity. Modernity has its own virtue and charm. Don't deprive yourself of it but just make sure that it is not at the cost of your own rich traditional values. Modernity is indeed a bliss but certainly not without the blessings of our Sanskriti and Sanskar.

एखाद्या सणावारी घराभायर रांगोळी घालात. कोकाकोला, पिनाकोला जाय तितलो पीयात पण वसंतपंचमीक केल्ले पानकभी तितलेच आवडीन पीयात.

मायकल जॅक्सनालो Dangerous Album जरूर आयकयात. जरासुध्दा डेंजरस ना. पण संधी मेळयार – 'माका गुंडायलोऽऽऽ' भी आयकात.

लग्न झाले नंतर हनिमून जरूर सिंगापूर, पॅरीस, लंडन, खय जाय थय, सिलेब्रेट करात. आता सगळे जगच ग्लोबल विलेज झाला. पण लग्नानंतर एकपटीतरी बायलेक घेवन स्वत:ल्या कुलदेवतेले दर्शन आणि आशिर्वाद घ्यात. तातूत खूपच कल्याण आसा. हांगा हाव मगलो एक अनुभव सांगता. मगेले लग्न ३० मे १९६४ क मुंबईत सचिवालय जिमखान्यात झाल्ले. लोकान सांजे रिसेप्शनात अहेरात माका दोन रुपयापासून दिल्ली एकूण रक्कम जवळजवळ रु.२४०० पर्यंत झाल्ली. मगेल्या बाबान तातूतल्यान, हॉलाभाडे,

सनईचौघडावाल्याले, भटाले वगैरे सगळयाले पैशे दिले आणि मगेल्या हातात उरील्ले ६०० रु. दवरले आणि सांगले की हातूत तू तुगेलो हनिमून कर. युरोपात वच ना जाल्यावर अमेरिकेत वच. खय जाय थय वच. आम्ही ६०० रुपयात फक्त गोयात श्री. शांतादुर्गा देवस्थानात ४ दिवसाखातेर वचू शकले आणि थयच अग्र शाळेत एका खोलीत रावले. या चार दिवसात फक्त देवतेल्या आरतीनंतर जवणा-खाणा खातेर, आम्ही रोज फक्त दोनतीन वेळा खोलीतल्यान थोड्यावेळा खातेर भायर पडताले. तेन्ना मगेले अशे मत आसा की खास कर्न हनिमूनाक, युरोप, अमेरिकेत आणि इतर परदेशात वच्च्यात मूर्खपणा आसा. तुम्ही जर खोली भायरच पडना जाल्यार कसले साईटसिईंग करतले. आणि तुमगेलो तातून काहीच दोष ना कारण सगळयात उत्तम साईट खोलीतच उरता.

दिवसरात्र जाय तितली तुमका आवडतात ती गाणी आयकयात. 'लुंगी डान्स' गाणे हजारपटी आयकयात आणि म्हणात पण रोज फक्त एकपटीतरी सकाळी गायत्री मंत्र म्हणात. तुमका कल्पना ना ताणे तुमका कितलो आत्मविश्वास, सुख आणि आरोग्य मेळतले.

आणि दोन गोष्टी सांगच्याक माका खूप अभिमान दिसता.

एक म्हळयार - आमगली सून - आमगेलो चलो अतुलाली बायल-वंदना-CKP घरातली. पण लग्नाच्या पैल्या दिवसापासूनच आम्ही सगळे तिजेलांगी कोकणीतच उलैताले. सून मराठीत आणि आम्ही कोकणीत उत्तर दिवचे. आता वंदना अगदी अस्खलीत कोकणी उलैता. कालच मगेल्या बायलेक तिगलो फोन आयिल्लो - गरममसाल्याच्या फोवात कोळश्याचे धुवण घालचे मूं? आणि कसल्या तरी आमटाक फोण्णाक कित कित घालू? सांगा..

मगेलो डॉक्टर भाव सतीश जो Norway त स्थायीक झाला ताका दोन चले - दोघेही डॉक्टर. कोणे जर मुंबईच्यान मगेल्या भावाक फोन केलो आणि ह्या दोघांपैकी कोणे जर तो घेतलो तर ते स्पष्ट सांगतात कि तांका फक्त English, Norwaygian आणि कोकणीच येता. हिंदी, मराठी अजिबात येना. अश्या परिस्थितीत मगेल्या भावान आपल्याल्या चोरडाखातेर पुण्याचो फ्लॅट विकलो आणि गोयात नवीन घेतलो.

कोकणी भाषेत उलौचो आणि एक फायदोभी आसा. महाराष्ट्राभायर तुम्ही तुमका जाय त्या नाजूक, खाजगी आणि गंभीर विषयाचेर तुमगल्या स्मार्त कारवारकर साथीबरोबर बेधडक होड आवाजात निर्ष्चींतपणे चर्चा करु शकतात, जे तुम्ही महाराष्ट्रात इतले सहजपणे गर्दीच्या ठिकाणी उलौच्याक धजनात. पण एकपटी मात्र आमगेली पूर्ण फजिती झाली. कलकत्त्यात आसतना, बसात बशिल्ले तेन्ना, हाव मगेल्या बायलेबरोबर आमगले लग्न ठरिल्ले आणि नंतर लग्न झाल्ले त्या पिरेडातले आमी केल्ल्या पराक्रमाचे प्रसंग (?) अगदी रोमांटिकपणे सविस्तर होडान याद करतेर आशिल्ले आणि मज फाटल्यान बशिल्ल्या मनशान मगेल्या खांद्यार थाप मारली आणि सांगले की हाव उलैल्लो प्रत्येक शब्द ताका कळलो. माका

मागीर कळले कि त्या बंगाली मनशाली बायल स्मार्त कारवारकर सुखटणकराली चली आणि ताका आमगली भाषा थोडी थोडी कळताली.

**एक बीज (स्मार्त कारवारकराले कोकणी) ताजे जर एका वृक्षांत, परिवर्तन करचे आसा तर हे वैर सांगील्ले सोपे साधे सरळ उपाय सगळयान आत्मसात करच्या जाय तरच या बीजाचे एका प्रचंड वृक्षात परिवर्तन जातले.**

**अरुण भास्कर कसबेकर**
९८२०२ ९१३६५ / ८७७९९ ८६६०६

◇ ◇ ◇

**('प्रकाश झोत' पृष्ठ ७ वरुन)**

**प्रा. विट्ठल (शिवानंद) पालेकर यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने**

आपल्या ज्ञातीतले भौतिक (फिजिक्स) विषयाचे गुणी व नामवंत शिक्षक प्रा. विठ्ठल (शिवानंद) मंगेश पालेकर यांची ९ डिसेंबर २०१७ रोजी जन्मशताब्दी. हा दिवस त्यांच्या तीनही मुली मीना, शामला व विजया यांनी निकटवर्तीयांसमवेत साजरा केला. त्यांच्या हृदय आठवणींना उजाळा देऊन सर्वांनी त्यांच्या स्मृतीला आदरांजली वाहिली.

प्रा. पालेकर हे शिवानंदभाऊ म्हणूनच परिचीत होते. त्यांच्या मूळ गांव कडवाड हा असला तरी त्यांचे संपूर्ण आयुष्य मुंबईतच गेले. त्यांनी फिजिक्स विषयांत एम्. एस्सी. पदवी मिळविली होती. त्या विषयाचा त्यांचा अभ्यास फार दांडगा होता व त्यामुळे विद्यार्थी जगतात त्यांच्याबद्दल सर्वांना आदराची भावना होती. देशविदेशात मोठ्या पदावर पोहोचलेले त्यांचे विद्यार्थी शिवानंदभाऊंना गुरुस्थानी मानतात. सुरुवातीला त्यांनी सिध्दार्थ महाविद्यालयांत अध्यापन केले. रेल्वेमंत्री झालेले मधु दंडवते हेही तेथे फिजिक्सचे अध्यापक होते. १९६२ साली गोरेगांव येथे पाटकर महाविद्यालय सुरु झाले तेव्हां त्यांची प्राचार्यपदावरील नेमणूक ठरली होती. पण अध्यापनाकडे व विद्यार्थ्यांकडील संपर्काकडे दुर्लक्ष होईल म्हणून ते पद त्यांनी नाकारले व उपप्राचार्यापद भुषविले. त्यांच्या मुलींना पाटकर कॉलेजमध्ये शिक्षण विनामूल्य होते पण शिवानंदभाऊ आपल्या मुलींची फी भरायचे व त्याऐवजी गरीब विद्यार्थ्यांना विनामूल्य प्रवेश द्यायचे, एवढे ते उदारमतवादी होते. भौतिकशास्त्र शिकायला त्यांच्या घरी विद्यार्थ्यांची रीघ असे व कुणाकडूनही मोबदला न घेता ते त्यांना मार्गदर्शन करायचे.

ते अत्यंत खेळकर व मनमिळाऊ स्वभावाचे असल्याने सर्वांना प्रिय होते. त्यांचे व त्यांच्या पत्नी शकुंतला (शकुनताई) यांचे वास्तव्य दादर टी.टी जवळील पुनावाडीमध्ये होते. त्यांचे हे मध्यवर्ती घर म्हणजे सर्व निकटवर्तीयांचा एक अड्डा असे. शास्त्रीय गायनाचे सुध्दां ते दर्दी होते २००३-२००४ हे वर्ष आपल्या एज्युकेशन सोसायटीचे शत सांवत्सरिक वर्ष. त्याच्या औचित्याने नोव्हेंबर २००३ मध्ये ज्ञातीच्या वार्षिक स्नेहसंमेलनात एज्युकेशन सोसायटीतर्फे ज्ञातीतील दहा ज्येष्ठ शिक्षकांचा जाहीर सत्कार करण्यात आला होता तेव्हा शिवानंदभाऊंचाही सत्कार करण्यात आला.

शिवानंदभाऊचे १८ फेब्रुवारी २००५ रोजी दु:खद निधन झाले.

# निधन

| | | |
|---|---|---|
| सुनंदा (चारु) दुर्गादास भेंडे | (हळियाळ) | नेरुळ |
| शांताराम (किशोर) दुर्गादास बोरकर | (कडवाड) | वांद्रे |
| ज्ञानेश्वर दत्तात्रय देसाई | (कडवाड) | अंधेरी |
| गुरुप्रसाद श्रीपाद दिवेकर | (केरवडी) | बंगळूर |
| शरत यशवंत दिवेकर | (कणसगिरी) | दादर |
| नीता प्रकाश दुभाषी | (मखेरी) | सांताक्रुज |
| सुनंदा प्रभाकर कसबेकर | (खारगे) | देवनार |
| विमल वैकुंठ कसबेकर | (कडवाड) | माहीम |
| शांता (अनसूया) शंकर कसबेकर | (कडवाड) | खार |
| प्रभाकर (पबी) दुर्गाराम कुलकर्णी | (हळगे) | पुणे |
| सुभाष मोहन मुझुमदार | (अंकोला) | इंदूर |
| मिलींद मनोहर मुझुमदार | (अंकोला) | डोंबीवली |
| मीरा भालचंद्र नाडकर्णी | (मल्लापूर) | वांद्रे |
| विठ्ठल (बाळा) वामन नाडकर्णी | (अंकोला) | पुणे |
| नॅन्सी रामचंद्र (किशोर) नाडकर्णी | (अंकोला) | अमेरिका |
| सुलोचना मोहन नेत्रावळी | (अंकोला) | जोगेश्वरी |
| प्रसाद मधुकर पिकळे | (अंकोला) | सांताक्रुज |
| नीलकंठ (रजनीश) गणपती (दिनू) शेटगिरी | (अंकोला) | माहीम |
| मनोरमा सदानंद (एकनाथ) वागळे | (माजाळी) | पनवेल |
| सुमन रुद्रा (बाबुराय) वागळे | (बाड) | पुणे |
| अंजनी मधुकर (गोकुळ) वागळे | (माजाळी) | पुणे |
| उषा आनंद वर्टी | (सदाशिवगड) | पुणे |
| मंगला रमाकांत वर्टी | (बाड) | सांताक्रुज |

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

**(मागील अंकानंतर)**

**उल्लेखनीय देणग्या**

### कै उमेश भेंडे यांच्या इच्छेनुसार समाजसेवानिधीसाठी व वैद्यकीय साहाय्या प्रीत्यर्थ ५७,५०,००० रुपयांची विक्रमी देणगी

तपशील 'संपादकीय' पृष्ठ ३

### श्री प्रभाकर वामन नाडकर्णी यांच्या इच्छेनुसार तीन लाख रुपयांची देणगी

पूर्वी पारले येथे राहणारे व नंतर पुणे येथे स्थायिक झालेले मूळ अगळी गांवचे श्री. प्रभाकर वामन नाडकर्णी हे औषध निर्मिती व्यवसायांत तज्ज्ञ होते. त्यांना ज्ञातीच्या कार्यात विशेष रस होता. मागे आपल्या एज्युकेशन सोसायटीमार्फत दिवाळीच्या वेळी घरोघरी जाऊन वर्गणी गोळा करण्याची प्रथा असे. त्यावेळी कै. विश्वनाथ सर्वोत्तम तेलंग यांच्या समवेत त्यांच्या स्कुटरवरुन कुर्ला ते वर्सोवा व वान्द्रे ते अंधेरी एवढा प्रचंड परिसर हिंडून ते ज्ञातिबांधवांकडून वर्गणी गोळा करीत.

शालेय शिक्षणांत कन्नड भाषा हे माध्यम असले तरी कोकणी, मराठी, ऊर्दू व हिंदी भाषांचा त्यांचा दांडगा अभ्यास होता. हिंदी भाषेतल्या अनेक कथा व कादंबऱ्या कोकणीत अनुवाद करुन प्रसिध्द केलेल्या आहेत. त्यांचे कोकणी भाषेतील प्रकाशित कविता संग्रह म्हणजे 'गजलप्रभा', 'शिशिरातील शेवते फुला' व 'वळेसर शेर शायरीचो'

गेल्या वर्षी ११ ऑक्टोबर रोजी दसऱ्याच्या दिवशी त्यांचे पुणे येथे निधन झाले. त्यांच्या प्रथम पुण्यतिथीच्या प्रसंगी त्यांच्याच मिळकतीतून त्यांच्याच इच्छेनुसार त्यांच्या पत्नी श्रीमती पुष्पा यांनी तीन लाख रुपयांची देणगी दिली आहे. त्यातील एक लाख रुपये प्रत्येकी समाजसेवा निधीसाठी व एज्युकेशन सोसायटीसाठी आहेत व पन्नास हजार रुपये प्रत्येकी वृद्धसेवानिधी व वैद्यकीय सेवा निधीसाठी आहेत.

### श्रीमती मीरा व श्री. भालचंद्र नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ दोन लाख दोन रुपयांची देणगी

आपल्या बँकेचे एक संचालक श्री. अनिल भालचंद्र नाडकर्णी यांचे वडील श्री. भालचंद्र दत्तात्रय नाडकर्णी यांचे २००८ साली निधन झाले तर आई श्रीमती मीरा यांचे अलीकडेच जून महिन्यांत निधन झाले. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ एकूण दोन लाख दोन रुपयांची देणगी मिळाली आहे. त्यातील एक लाख एक रुपये श्री. भालचंद्र नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती मीरा यांच्या इच्छेनुसार वृद्धसेवा निधीसाठी आहेत व उर्वरीत एक लाख एक रुपये पुत्र श्री. अनिल व कन्या श्रीमती सुप्रिया कृष्ण नाबर यांच्यातर्फे श्रीमती मीरा यांच्या स्मरणार्थ वैद्यकीय साहाय्या प्रीत्यर्थ आहेत.

### डॉ. सदानंद नाडकर्णी यांच्या उमा विनायक ट्रस्टतर्फे १,८६,००० रुपयांची देणगी

सायन हॉस्पीटलचे निवृत्त अधिष्ठाता (डीन) डॉ. सदानंद विनायक नाडकर्णी यांचा

गेल्या वार्षिक स्नेहसंमेलनांत जाहीर सत्कार करण्यांत आला त्या संदर्भात मुखपत्रिकेच्या गेल्या अंकांत त्यांचा परिचय करुन देण्यांत आला होता. त्यांनी अलीकडेच उमा विनायक ट्रस्ट यांच्या नांवे १,८६,००० रुपयांची देणगी दिली आहे. त्यांतील प्रत्येकी ४७,००० रुपये संघाच्या समाजसेवानिधीसाठी व वृध्दसेवानिधीसाठी आहेत व उर्वरीत ९२,००० रुपये वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ आहेत.

## श्री. उमेश वाघ यांच्यातर्फे एज्युकेशन सोसायटीला एक लाख रुपयांची देणगी

बोरीवली येथे राहणारा कु. मयुरेश उमेश वाघ हा यंदा सी.ए. च्या परीक्षेत गुणवत्ता यादीत ४७ व्या क्रमांकाने उतीर्ण झाला. तेव्हा १९ नोव्हेंबर रोजी भरलेल्या ज्ञातीच्या वार्षिक स्नेहसंमेलनात एज्युकेशन सोसायटीतर्फे त्याला बक्षीस देऊन त्याचे कौतुक करण्यांत आले. दहावी, बारावी इत्यादी परीक्षेतही त्याला चांगले गुण मिळाल्याबद्दल त्याला बक्षिसे मिळाली होती. मयुरेश सी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाला त्या निमित्ताने कृतज्ञतेच्या भावनेने श्री. उमेश वाघ यांनी वडील रवींद्रनाथ कृष्णराव वाघ यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला एक लाख रुपयांची देणगी दिली.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. के. वाय. नाडकर्णी ट्रस्ट कडून | २,९०० |
| २. | श्री. प्रभाकर वामन नाडकर्णी यांच्या प्रथम पुण्यतिथीच्या प्रसंगी त्यांच्या इच्छेनुसार त्यांच्याच मिळकतींतून पत्नी श्रीमती पुष्पा यांच्यातर्फे | १,००,००० |
| ३. | श्रीमती प्रमिला व श्री. रत्नाकर दत्तात्रय देसाई यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. दिनेश यांजकडून. | ५,००० |
| ४. | श्रीमती यमुनाताई, सपाताई व सिंधुताई यांच्या स्मरणार्थ भाऊबीजे निमित्त बंधू श्री. मंगेश शंकर बोरकर यांजकडून. | ३,००३ |
| ५. | श्री. जगदीश अनंत तेलंग यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती आशा यांजकडून | २५,००० |
| ६. | श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २१ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |
| ७. | श्री. देवीदास विश्वंभर कसबेकर यांजकडून. | ११,००० |
| ८. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सुधा यांजकडून | १,००१ |
| ९. | उमा विनायक ट्रस्टकडून, डॉ. सदानंद नाडकर्णी यांच्यातर्फे | ४७,००० |
| १०. | श्री. उमेश शांताराम भेंडे यांच्या इच्छेनुसार त्यांच्याच मिळकतीतून बंधू श्री. किशोर भेंडे यांच्या मार्फत. | ४३,१२,००० |
| ११. | श्रीमती राधा गोविंद बोरकर यांच्या स्मरणार्थ नातू श्री. मिलींद दिनकर बोरकर यांजकडून. | १,००१ |

## वृध्दसेवानिधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. प्रभाकर वामन नाडकर्णी यांच्या प्रथम पुण्यतिथीच्या प्रसंगी त्यांच्या इच्छेनुसार त्यांच्याच मिळकतींतून पत्नी श्रीमती पुष्पा यांच्यातर्फे | ५०,००० |
| २. | श्री. गजानन सीताराम बोरकर यांच्या ६ व्या पुण्यतिथी निमित्त पत्नी श्रीमती विमल यांजकडून. | ५,००० |
| ३. | श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २१ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून. | १,००१ |
| ४. | श्री. देवीदास विश्वंभर कसबेकर यांजकडून. | ११,००० |
| ५. | उमा–विनायक ट्रस्टकडून, डॉ. सदानंद नाडकर्णी यांच्यातर्फे | ४७,००० |
| ६. | श्री. भालचंद्र दत्तात्रय नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती मीरा यांच्या इच्छे नुसार. | १००००१ |

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १. | उमा विनायक ट्रस्टकडून, डॉ. सदानंद नाडकर्णी यांच्यातर्फे | ९२,००० |
| २. | श्रीमती मीरा भालचंद्र नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. अनिल व कन्या श्रीमती सुप्रिया कृष्ण नाबर यांजकडून. | १००००१ |
| ३. | श्री. प्रभाकर वामन नाडकर्णी यांच्या प्रथम पुण्यतिथीच्या प्रसंगी त्यांच्या इच्छेनुसार त्यांच्याच मिळकतीतून पत्नी श्रीमती पुष्पा यांच्यातर्फे. | ५०,००० |
| ४. | श्री. उमेश शांताराम भेंडे यांच्या इच्छेनुसार त्यांच्याच मिळकतीतून बंधू श्री. किशोर भेंडे यांच्या मार्फत. | १४,३८,००० |


## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. के. वाय. नाडकर्णी ट्रस्टकडून. | २९०० |
| २. | श्री. प्रभाकर वामन नाडकर्णी यांच्या प्रथम पुण्यतिथीच्या प्रसंगी त्यांच्या इच्छेनुसार त्यांच्याच मिळकतींतून पत्नी श्रीमती पुष्पा यांच्यातर्फे | १,००,००० |
| ३. | श्रीमती वत्सला बाळकृष्ण वाघ निधीतून संघामार्फत. | २६०० |
| ४. | श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २१ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या मुलांकडून. | १००१ |
| ५. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सुधा यांजकडून. | १००१ |
| ६. | श्री. रवींद्रनाथ कृष्णराव वाघ यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. उमेश यांजकडून. | १,००,००० |

## ठाणे मंच देणगीदारांची यादी

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती गीता रामचंद्र वागळे, सांताक्रुज | ५,००० |
| २. | श्री. अनिल शिवानंद कसबेकर, जोगेश्वरी | ५,००० |

Regd. with registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.